by E-mail - 9/02/2026

महाराष्ट्र गोसेवा आयोग, [illegible]
औंध, पुणे-७
12 FEB 2026
आवक अ. क्र 191

सन २०२५-२६ मध्ये राज्यातील गोशाळांमध्ये ठेवण्यात येणा-या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रति दिन प्रति पशु रु.५०/- अनुदान देण्यासाठी निधी वितरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीयुडी-१०२५/प्र.क्र.२९९/पदुम-३ (E-१४०९५८२)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ०९ फेब्रुवारी, २०२६.

वाचा :- १. शासन निर्णय क्र.पविआ-११२४/प्र.क्र.१८४/ पदुम-३, दिनांक ०८.१०.२०२४.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४०/ अर्थ-३, दि.०७.०४.२०२५.
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.पविआ०४२५/प्र.क्र.१०६(भाग-१)/ पदुम-३, दिनांक ३०.०९.२०२५.
४. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.पविंआ-०६२५/प्र.क्र.१५९/पदुम-३, दिनांक ०६.१०.२०२५.
५. सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग यांचे पत्र क्र.मगोसेआ/पुरवणीमागणीप्र.क्र.०१/१५२५/२०२५,दि.२७.१०.२०२५.

शासन निर्णय :-

वाचा येथील क्र.१ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रति दिन प्रति पशु रु.५०/- अनुदान योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात मागणी क्र. डी-४. २४०३. पशुसवर्धन, १०२, पशु व महिष विकास, (१०), गोशाळा व पांजरपोळ विकास, (१०) (०५) महाराष्ट्र गोसेवा आयोग (राज्य हिस्सा १०० टक्के) (कार्यक्रम) सांकेताक क्र.२४०३ ई४९६ या लेखाशिर्षाखाली, ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टांतर्गत रु.७००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. तसेच विधानमंडळाच्या सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे रु.१०००.०० लक्ष व हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीव्दारे रु.१२२५२.७८ लक्ष असा एकूण रु.१३९५२.७८ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला. सदर उपलब्ध निधीपैकी वित्त विभागाने एकूण रु.७५८१.०० लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.

लेखा (पविअ(नि)
12-02-2026.

राज्यातील गोशांळामध्ये ठेवण्यात येणा-या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रति दिन प्रति गाय रु.५०/- इतके अनुदान गोशाळांना देण्यासाठी वाचा क्र.३ येथील शासन निर्णय दिनांक ३०.०९.२०२५ अन्वये रु.४२०.०० लक्ष व वाचा क्र.४ येथील शासन निर्णय दिनांक ०६.१०.२०२५ अन्वये रु.१०००.०० लक्ष असा आतापर्यंत एकूण रु.१४२०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता सदर प्रयोजनासाठी लेखाशीर्ष २४०३ई४९६ अतर्गत ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दीष्टाअंतर्गत उपलब्ध असलेला रु.६१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

१. परिपोषण अनुदान देण्यात येणा-या सर्व गायींची भारत पशुधन प्रणालीवर नोंद असल्याची खातरजमा करण्यात यावी.
२. योजनेचा उद्देश विचारात घेता अनुदान देण्यात येणा-या गायी या प्रामुख्याने भाकड व अनुत्पादक आहेत, याची खातरजमा करण्यात यावी.
३. आयोगाकडून गोशाळांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रजिस्टरमध्ये सर्व नोंदी ठेवण्यात आल्या आहेत, याची खातरजमा संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी करुन त्याप्रमाणे प्रमाणित करण्यात यावे. तद्नंतरच सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग यांनी अनुदान वितरीत केले जाईल याची दक्षता घ्यावी.
४. ज्या महिन्याचे परिपोषण अनुदान देण्यात येणार आहे, त्या महिन्यात सदर गायींचे संबंधित गोशाळेत पूर्णवेळ वास्तव्य असणा-या देशी गायीनांच अनुदान देण्यात यावे.
५. गायींच्या उपस्थितीबाबत नोंद घेण्यासाठी Online प्रणाली तातडीने विकसित करण्यात यावी..
६. पोलीस कारवाईदरम्यान जप्त करुन गोशाळेत ठेवण्यात येणाऱ्या गायींच्या परिपोषणाचा खर्च संबंधितांकडून गोशाळेस देण्यात येत असल्याने, अशा गायींसाठी सदर योजनेंतर्गत अनुदान देण्यात येऊ नये.
७. प्रत्येक गोशाळेने यापूर्वी वितरीत केलेल्या निधीचे विनियोजन कसे केले आहे, याबाबतचा अहवाल घेण्यात यावा. तसेच सदर अनुदानाचा विनियोग त्याच प्रयोजनासाठी झाला असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित गोशाळेकडून घेण्यात यावे.
८. अनुदान वितरीत करताना पात्र ठरलेल्या गोशाळांमधील पात्र गायींनाच महा-डीबीटी व्दारे अनुदान देण्यात येईल.
९. शासन निर्णय क्र.पविआ-११२४/प्र.क्र.१८४/ पदुम-३, दिनांक ०८.१०.२०२४. अन्वये विहित केलेल्या अटींनुसार अनुदान देण्यासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या देशी गायींची

निवड झाली असल्याची खातरजमा करुनच अनुदान वितरीत करण्याची जबाबदारी सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग यांची राहील.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.५०/२०२५/व्यय-२, दि.०३.०२.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(नि. भा. मराळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे.
२. सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे.
३. महालेखापाल कार्यालय १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण), मुंबई / नागपूर.
४. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
५. कक्ष अधिकारी /१६, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवड नस्ती पदुम-३.